चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

१९ फेब्रुवारी, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक १८/०२/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **चंद्रपुर शहर, घुग्घुस, वरोरा, माजरी, मुल, सिंदेवाही, सावली, तळोधी, राजुरा, सावली, कोठारी, भद्रावती** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **१४** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन **०५** आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयात एकुण **४२,४००/—रू.** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

———————————————————————————————————————

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7276494810 (PRO)

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीस शिक्षा

पोलीस स्टेशन राजुरा अंतर्गत फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीस १८/०२/२०१९ रोजी **कु. स.ज. अंसारी मॅडम, जिल्हा न्यायाधीश क्र. २, जि. चंद्रपुर यांनी** शिक्षा ठोठावली.

दिनांक २३/०१/२०१७ रोजी मौजा हरदोना खुर्द येथे यातील आरोपी नामे निलेश रमेश मोहुर्ले वय २० रा. हरदोना ता. राजुरा. जि. चंद्रपुर याने फिर्यादीच्या ४ वर्षीय अल्पवयीन पिडीत मुलीला बिस्कीट देतो असे सांगुण गावाबाहेरील कोंडवाडयात नेवुन तिचा विनयभंग केला. अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन राजुरा येथे अप.क्र. ६७/२०१७ कलम ३५४, ३५४(अ) भादंवि सहकलम १२ पोस्को ३(१),डब्लु, ३(२) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास श्री. शेखर देशमुख, उपविभागीय पोलीस अधिकारी राजुरा, यांनी गुन्हयातील आरोपीस निष्पन्न करून आरोपींविरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक १८/०२/२०१९ रोजी आरोपी नामे निलेश रमेश मोहुर्ले वय २० रा. हरदोना ता. राजुरा. जि. चंद्रपुर यास कलम ३५४ भादंवि मध्ये १ वर्ष सक्त मजुरीची शिक्षा व १,०००/—रू दंड न भरल्यास ०२ महिने शिक्षा, कलम ३५४(ब) भादंवि व सहकलम ११, १२ पोक्सो मध्ये २ वर्ष कारावासाची शिक्षा व २,०००/—रू दंड, न भरल्यास ०४ महिने शिक्षा **कु. स.ज. अंसारी मॅडम, जिल्हा न्यायाधीश क्र. २, जि. चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. श्री. महाजन, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** यांनी काम पाहीले असुन कोर्ट पैरवी म्हणुन नापोशि सुखदेव मेश्राम. **पोस्टे राजुरा** यांनी काम पाहिले.

————————————————————————————————